POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

गणपती बाप्पा मोरया



मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-३३ ● मुंबई, गुरुवार,०४ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## न्यायालयाचा सवाल -आंदोलन काळात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, भरपाई कोणाकडून वसूल करणार?

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी उभारलेल्या लढ्याला मंगळवारी (02 सप्टेंबर) यश मिळालं. सरकारचा जीआर स्वीकारल्यानंतर मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू पाणी पिऊन आपलं बेमुदत उपोषण संपवलं आणि आंदोलन देखील संपलं. मात्र मराठा आंदोलनासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात आज (03 सप्टेंबर) तिसऱ्या दिवशी पुन्हा सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी पाच दिवसांच्या मराठा आंदोलनदरम्यान मुंबईत झालेल्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसान भरपाईचे काय? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने विचारला आहे.प्रभारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठात मराठा आंदोलनासंदर्भात आज सुनावणीला सुरुवात झाली. यावेळी मराठा आंदोलन सरकारच्या मध्यस्थीने संपल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली. यानंतर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला की, मराठा



आंदोलन काळात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई कोणाकडून वसूल करणार? न्यायालयाच्या प्रश्नावर मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी न्यायालयाला सांगितले की, पोलिसांनी या प्रकरणी काही गुन्हे दाखल केले आहेत. त्याद्वारे भरपाईचा मुद्दा निकाली लावला जाईल.

मात्र आंदोलकांनी रस्ते, पदपथ, बस आणि रेल्वे स्थानके अडवण्यापलिकडे काहीही नुकसान केलेले नाही, असे मराठा आंदोलनाच्या आयोजकांकडून न्यायालयात स्पष्ट करण्यात आले. मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी दावा केल्यानंतर न्यायालयाने काही छायाचित्रे दाखवले आणि या छायाचित्रात नुकसान झाल्याचे दिसत असल्याचे म्हटले. तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रातून दिसत आहे, असा पुनरूच्चार न्यायालयाने केला. यावर आयोजकांनी सांगितले की, मराठा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र न्यायालयाने नुकसान भरपाईबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश मराठा आंदोलनाच्या आयोजकांना दिले. न्यायालयाने म्हटले की, मनोज जरांगे यांनी चिथावणी दिल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत दाखल झाले होते. त्यामुळे याबाबतही मनोज जरांगे आणि मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. यावर मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी सांगितले की, मनोज जरांगे यांनी अशा प्रकारची कोणतीही भाषणे केलेली नाहीत. किंबहुना, आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून ते उपोषणाला बसले होते, असा दावा करत मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी न्यायालयाने केलेल्या आरोपाचे खंडन करण्याचा प्रयत्न केला. मात्र न्यायालयाने त्यांना आदेश दिले की, यासंदर्भात तोंडी माहिती देऊ नका, प्रतिज्ञापत्राद्वारे तुमची भूमिका स्पष्ट करा.

तसेच मराठा आरक्षणाचा विषय आता मार्गी लागला असल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही. परंतु, आम्हाला काहीही तोंडी नको आहे. त्यामुळे, मराठा आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्रावर आपली बाजू मांडावी. त्यानंतर याचिका निकाली काढली जाईल, असे स्पष्ट करताना न्यायालयाने प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मराठ आंदोलनाच्या आयोकांना चार आठवड्यांची मुदत दिली आहे.

## पंजाबमध्ये ९ जिल्ह्यांना पुराचा वेढा! वैष्णोदेवी मंदिर ७ दिवसांपासून बंद

**■पंजाब। प्रतिनिधी,**

पंजाब मधील पठाणकोट, होशियारपूरसह ९ जिल्ह्यांना आठवडाभरापासून पुराने वेढा घातला आहे. तेराशेहून अधिक गावांतील अडीच लाखांहून अधिक लोकांना याचा फटका बसला. आतापर्यंत २९ जणांचा मृत्यू झाला. पंजाबसोबतच उत्तराखंड, जम्मू काश्मीर, हरयाणा या राज्यांनाही पावसाने झोडपले. दरम्यान, दरड कोसळल्यामुळे वैष्णोदेवी मंदिर ७ दिवसांपासून बंद आहे. उत्तराखंडमधील सर्व शाळांनाही सुट्टी देण्यात आली आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आज उच्चस्तरीय बैठकीत पूरस्थितीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रात्री फोनवर बातचीत करत मुख्यमंत्री मान यांना केंद्र सरकार सर्वतोपरी मदत करील, अशी हमी दिली. पंजाबमधील पूरस्थितीमुळे शेजारच्या हरयाणातील परिस्थितीही गंभीर होत आहे.



दोन्ही राज्यांतून वाहणाऱ्या नद्या धोक्याच्या पातळीवर आहेत. हरयाणात गेल्या तीन दिवसांपासून अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती आहे. त्यामुळे शाळांना सुट्टीही देण्यात आली आहे. राज्याचे आर्थिक केंद्र असलेल्या गुरुग्राममधील खासगी कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमचा आदेश दिला आहे. वैष्णोदेवी यात्रा मार्गावर २६ ऑगस्टला दरड कोसळल्याने शेकडो भाविक कटरा येथे अडकले आहेत.

यात्रा मार्गावर दुरुस्तीचे काम सुरू असल्याने वैष्णोदेवी मंदिर ७ दिवसांपासून बंद आहे. दुरुस्ती काम पूर्ण झाल्यानंतरच यात्रा पूर्ववत होईल, असे वैष्णोदेवी मंदिर समिती व्यवस्थापनाने सांगितले.

गृहमंत्री अमित शाह पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी श्रीनगरला पोहोचले. उत्तराखंडमधील सर्व १३ जिल्ह्यांतील शाळा-कॉलेजला सुट्टी देण्यात आली. केदारनाथ मार्गावर भुस्खलन झाल्याने दोघांचा जीव गेला. मुसळधार पावसामुळे चारधाम यात्रा ५ सप्टेंबरपर्यंत स्थगित करण्यात आली आहे. हिमाचल प्रदेशातही आठ जिल्ह्यांत शाळा-कॉलेजला सुट्टी देण्यात आली आहे.

वैष्णोदेवी यात्रा मार्गावर २६ ऑगस्टला दरड कोसळल्याने शेकडो भाविक कटरा येथे अडकले आहेत. अडकलेल्या ५०० यात्रेकरूंना हॉटेलचालकांनी राहण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून दिली. तसेच मोफत जेवणही दिले जात आहे. यात्रा मार्गावर दुरुस्तीचे काम सुरू असल्याने वैष्णोदेवी मंदिर ७ दिवसांपासून बंद आहे. दुरुस्ती काम पूर्ण झाल्यानंतरच यात्रा पूर्ववत होईल, असे वैष्णोदेवी मंदिर समिती व्यवस्थापनाने सांगितले.

## अल्पवयीन मुलाने भिक्षेकरीच्या डोक्यात दगड घालत केला खून

**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. अल्पवयीन मुलाने एका भिक्षेकरीच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना नाशिकमध्ये घडली आहे. सोबत असलेल्या मैत्रिणीची छेड काढल्याच्या संशयावरुन त्र्यंबक नाका परिसरात एका अल्पवयीन मुलाने एका भिक्षेकरीच्या डोक्यात दगड घालून भर दिवसा खून करत मृतदेहा जवळच हातवारे करत नाचल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. आरोपी अल्पवयीन मुलगा मैत्रिणीसोबत ठक्कर बजार जवळील एका हॉटेल जवळ उभा होता. त्यावेळी त्याची मैत्रीण पाण्याची बाटली आणण्यासाठी गेली असता तिथे एक भिकारी बसलेला



होता. त्याने या मुलीची छेड काढण्याचा संशय त्या विधीसंघर्षित मुलाला आल्याने त्याने रागाच्या भरात त्याच्या डोक्यात दगड टाकला या घटनेत अज्ञात भिक्षेकरीचा मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला, यातील संशयित अल्पवयीन आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आह. तर मृत्यूदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरू असून सरकारवाडा पोलिस पुढील तपास करत आहे.

## वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या ७४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**■भिवंडी । प्रतिनिधी,**

भिवंडी महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांनी एका आदेशाद्वारे २०१७ पासून एकच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या ७४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. आयुक्तांच्या या आदेशाने मागील कित्येक वर्ष एकच विभागात ठाणे मांडून आपले बस्तान बसविलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.२९ ऑगस्ट रोजी सायंकाळी काढलेल्या या आदेशानुसार बदल्या





करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने नविन विभागात रुजू होण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. भिवंडी महानगरपालिकेत लिपीक पदावर कार्यरत अनेक कर्मचारी हे वर्षानुवर्ष एकाच विभागात कार्यरत होते. अनेक नागरीक, पदाधिकारी,समाजसेवक यांच्या याबाबत तक्रारी आयुक्तांकडे प्राप्त होत होत्या.विभाग प्रमुखांच्या विहीत कालावधीमध्ये बदल्या होत असतात,मात्र त्या विभागातील लिपीक वर्षानुर्वर्ष एकाच टेबलवर किंवा विभागात काम करीत असल्याने त्यांच्या कामामध्ये एक साचेबद्धपणा आला होता.कोणतीही नविन कल्पना राबविली जात नव्हती.तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या सेवा कालावधीमध्ये विविध विभागांचे काम शिकणे आवश्यक आहे. त्यानुसार २०१७ पुवीर्पासुन एकाच विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अन्य विभागात बदल्या करण्यात आल्या आहेत.जर बदली झालेले कर्मचारी नविन ठिकाणी रुजू झाले नाहीत, आणि त्यांनी बदली रद्द करणे किंवा सुधारीत करणेकरिता राजकीय, अराजकीय दबाव आणल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे. अशी माहिती प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त अजित महाडिक यांनी दिली आहे.

## शहापूर येथे ओबीसी संघर्ष समिती आक्रमक





**■शहापूर। प्रतिनिधी,**

मराठा समाजाचे सरसकट ओबीसीकरण करण्याच्या मागणीला तीव्र विरोध दर्शवित ओबीसी संघर्ष समिती, ठाणे तर्फे शहापूर येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून मनोज जरांगे हजारो मराठा बांधवांसह आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण करत आहेत. त्यांची प्रमुख मागणी म्हणजे मराठा समाजाचे सरसकट ओबीसीकरण. या मागणीस समितीने असंवैधानिक ठरवत निषेध नोंदवला. ओबीसी संघर्ष समितीचे सेक्रेटरी प्रमोद जाधव म्हणाले, मराठा समाजाला आतापर्यंत खत्री आयोग, बापट आयोग, सराफ आयोग, बाठिया आयोग यांनी मागास ठरवलेले नाही. त्यामुळे त्यांचे ओबीसीकरण शक्य नाही. मात्र, त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्याचा विचार सरकारने करावा. अन्यथा ओबीसी समाज जिल्हा-पातळीवर तीव्र आंदोलन उभारेल, अशा इशारा यावेळी देण्यात आला. समितीने राज्य सरकारला आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर घाईगडबडीत निर्णय न घेता कायद्याच्या चौकटीत तोडगा काढण्याचे आवाहन केले.या प्रसंगी विनोद भोईर, साधना भेरे, संगीता भेरे, रमेश वनारसे, उपोषणकर्ते भरत निचिते, अप्पुताई खाडे, कुंडलिक पाटील, रवींद्र जाधव, रमेश निचिते, दिनेश गायखे आणि भालचंद्र तारमाळे आदी उपस्थित होते.

## केवायसी अपडेटच्या नावाखाली आर्थिक फसवणूक; सायबर पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे तक्रारदारास ₹१,९९,०००/- ची रक्कम परत.

**■आचोळे। प्रतिनिधी,**

KYC अपडेट करण्याचे सांगुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली १,९९,०००/- रुपये रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश. अधिकमाहतीनुसार मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील आचोळे पोलीस ठाणेच्या हद्दीतील तक्रारदार श्रीमती. जाधव यांना अनोळखी इसमाने फोन करुन बँकेतुन बोलत असल्याचे सांगितले. तक्रारदार यांची बँक खात्याची KYC तात्काळ अपडेट न केल्यास बँक खात्याचे व्यवहार बंद होणार असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी अनोळखी इसमाने तक्रारदार यांचेकडुन त्यांचे बँक खात्याची व इतर वैयक्तिक माहिती घेतली व त्यानंतर तक्रारदार यांच्या बैंक खात्यातुन रक्कम कपात झाल्याचा मॅसेज त्यांच्या मोबाईलवर प्राप्त झाला. तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने अजार्ची तात्काळ नोंद घेवुन NCCRP Portal वर 31907250131740 अन्वये देखील तक्रार नोंदविण्यात आली .





तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बैंक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा. न्यायालय यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करून तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपए १,९९,०००/- रक्कम त्यांचे मूळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे. आहे. तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्यात आलेनंतर रक्कम परत केल्याबाबत प्रतिकात्मक चेक देवून माहिती देण्यात आलेली

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

बँकेतील कर्मचारी बँक खात्याचे माहितीकरीता ग्राहकांना फोनद्वारे / एसएमएस संपर्क साधून कोणत्याही माहितीची देवाण-घेवाण करीत नाहीत. फोनद्वारे कोणत्याही अनोळखी मोबाईल धारकास क्रेडीट/डेबिट कार्ड व बँकेच्या माहिती उघड करु नये.

बँक खात्यासंदर्भात कोणत्याही माहितीकरीता समक्ष बँकेत जावुन संपर्क करावा, फोनद्वारे कोणतीही माहिती उघड करु नये. अनोळखी लिंक अगर मॅसेज प्राप्त झाल्यास पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये. कोणतेही ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी त्याची पडताळणी करावी.

अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती / आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.

ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930/1945 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार यावी.

सदरची कामगिरी मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोउनि/ वैभव धनवडे, मपोहवा/माधुरी धिंडे, मपोअं/सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, मसुब राजेश भरकडे सर्व नेम सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक १९३०/१९४५ सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट www.cybercrime.gov.in



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## यशाचं पुढचं पाऊल



ज्याचा शेवट गोड, ते सारंच गोड अशी मराठीत म्हण आहे. गेले पाच दिवस मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनाबाबत अगदी तसंच म्हणता येईल. 'सगळ्या मागण्या मान्य केल्याशिवाय उठणार नाही' असा निर्धार करून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे - पाटील यांनी परवापासून निर्जळी उपोषण सुरू केल्याने या ठिय्या आंदोलनाचं गांभीर्य चांगलंच वाढलं होतं. आंदोलकांची मोठी संख्या, त्यांनी वापरलेली दक्षिण मुंबई आणि गालबोट म्हणावं असे काही तुरळक, अनावश्यक प्रसंग घडल्याने हे आंदोलन म्हणजे 'जिवंत बॉम्ब' आहे, अशी चर्चा प्रशासनाच्या वतुर्ळात सुरू झाली होती. दक्षिण मुंबईतल्या 'टिपिकल जनते'कडून तर अख्खी मुंबईच या बॉम्बवर बसली आहे; तो कधीही फुटू शकतो, अशा प्रकारची भीतीची भाषा सुरू झाली होती. ही भीतीच न्यायालयाच्या दालनांमध्ये काहींनी नेली आणि त्यातून न्यायालयाने आंदोलनाला व्यवस्थेचा बडगा उगारून शिस्तीत आणण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातून अनावस्था प्रसंग उद्भवू नये, अशी सगळ्यांचीच इच्छा होती. त्यासाठी कालचा दिवस कसोटीचा होता. सरकारने योग्यवेळी पुढाकार घेऊन आंदोलनकर्त्यांचं समाधान केलं आणि त्यामुळे एक मोठी चिंता मिटली असंच म्हणावं लागेल. एका बाजूला आंदोलनाच्या अवघड मागण्या आणि दुसऱ्या बाजूला आंदोलकांची वाढत चाललेली संख्या आणि त्याबरोबरच अस्वस्थता या कात्रीत सरकारवरचा दबाव वाढत होता. पण, मंत्रिमंडळ उपसमितीने ऐनवेळी घेतलेल्या कष्टाने सरकारला या कात्रीतून सोडवलं. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांना त्यामुळेच गुलालात नाहण्याची संधी मिळाली. आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रातील मराठ्यांचं होतं, हे खरं. पण त्याला खरी ताकद दिली, ती मराठवाड्यातल्या गांवागांवातल्या मराठा ज्ञातीबांधवांनी. त्यांना आवश्यक 'शिदोरी' पोहोचवण्याचं काम मराठवाडा आणि मुंबईदरम्यानच्या जिल्ह्यातील मराठा संघटनांनी, विविध गटांनी केलं. मुंबईतूनही शेवटच्या दोन-तीन दिवसांत चांगली मदत केली गेली. मराठवाड्यातल्या गांवागांवातून या आंदोलनासाठी सर्व तयारीनिशी गाड्या भरून आंदोलक आले, ते हैदराबाद गॅझेटचा निकष मान्य व्हावा या प्रमुख अपेक्षेपोटी. हैदराबाद गॅझेट गृहीत धरण्याचं मान्य झालं, की त्यातील नोंदी ग्राह्य ठरतील आणि त्यानुसार वंश परंपरागत हक्कही आपोआप सिद्ध होतील, ही त्यामागची साधी भावना होती. सरकारने दिलेलं आश्वासन आणि तातडीने काढलेला शासन निर्णय (जीआर) पाहता मराठवाड्यातल्या बहुसंख्य मराठ्यांची ही मागणी मान्य झाली. सरकारी पातळीवर आतापर्यंत हैदराबाद गॅझेटमधील उल्लेख प्रमाण मानले जात नव्हते. गेल्या पाच दिवसांच्या आंदोलनाने स्वातंत्र्यपूर्व काळातील, निजामाच्या राजवटीतले हे गॅझेट आता अधिकृत आधार म्हणून मान्य झालं. आंदोलकांना आपल्या आंदोलनाचं हेच मोठं सार्थक वाटलं. स्वतः जरांगे यांनीही याच मुद्द्याचं महत्त्व अधोरेखित करून आपलं निर्जळी उपोषण सोडलं. हैदराबाद गॅझेटनंतर आता सातारा आणि औंध या संस्थानांची गॅझेटही गृहीत धरली जावी, अशी मागणी आहे. टप्प्याटप्प्याने तीही मान्य होणार आहे. तसं झालं, तर आंदोलकांच्या दाव्यानुसार मराठवाड्याबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांचाही मोठा प्रश्न सुटेल. त्यांची कुणबी नोंद सोपी होईल. ती झाली, तर इतर मागासवर्ग प्रवगार्तील सर्व सवलती त्यांना उपलब्ध होतील. सरकार जेव्हा असे धोरणात्मक निर्णय घेतं, तेव्हा त्यात सर्वसाधारणतः मोठ्या प्रमाणावर असते. इच्छुक लाभार्थीर्ला स्वतःला त्यासाठी पात्र म्हणून सिद्ध करावंच लागतं. हे सिद्ध करणंच मोठं जिकिरीचं आणि वेळखाऊ आहे, अशी आंदोलकांची तक्रार होती. 'जो शेतकरी तो कुणबी' अशी सोपी व्याख्या केली, तर या व्याख्येत बसण्यासाठी जमिनीचा सातबारा हाच आधार ठरणार. पण, खरा गरीब आणि मागास तर शेतीत काम करणारा भूमिहीन शेतमजूर असतो. त्याला या व्याख्येत बसवण्यासाठी आधाराला काय घ्यायचं? हा प्रश्नही जरांगे - पाटील यांच्या उपोषणाने सोडवून घेतला. हैदराबाद गॅझेटच्या आधारे 'कुणबी', 'कुणबी मराठा' किंवा 'मराठा कुणबी' अशी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी गाव पातळीवर समित्या गठीत केल्या जाणार आहेत. १३ ऑक्टोबर १९६७ पूवीर्चा, तेव्हांच्या निजामाच्या राज्यात वाडवडिलांचं वास्तव्य असल्याचा पुरावा मिळवला, तर ही नोंद शक्य होणार आहे. 'सगेसोयरे' या शब्दावरून झालेल्या वादालाही तिलांजली मिळाली, असं समजायला वाव आहे. कुळ किंवा नातेसंबंधात कोणाकडे कुणबी जातीचं प्रमाणपत्र असेल, तर त्याआधारे प्रतिज्ञापत्राद्वारे आता तशाच जात प्रमाणपत्राची मागणी करता येईल. या दोन्ही निर्णयांनी मराठा जातीसाठी कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या ठोस शक्यता उपलब्ध करून दिल्या आहेत, यात वादच नाही. आरक्षण आणि जाती आधारे मिळणारे भौतिक फायदे हा सध्या मोठा वादग्रस्त आणि संवेदनशील विषय आहे. मराठ्यांच्या 'कुणबी मागणी'ला इतर मागासवर्गीय समाजाचा पहिल्यापासून विरोध आहे. त्या वगार्तील काहीशे जातींना महाराष्ट्रात आपल्यात आणखी वाटेकरी नको आहेत. त्यामुळे, मराठ्यांनी आंदोलनातून जे पदरात पाडून घेतलं, त्याला विरोध होईल, हेही गृहीत आहे. यापूर्वी प्रमाणे न्यायालयांत त्या विरोधात दादही मागितली जाईल. सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांनाही कदाचित आव्हान मिळेल. यापूर्वीच्या अनुभवावरून आंदोलकही त्याचा प्रतिवाद करण्यासाठी तयारीत असतीलच. 'मराठ्यांना आरक्षण'पासून 'मराठा आणि कुणबी एकच' द्वारा मागणी आता ' मराठा- कुणबी किंवा कुणबी- मराठ्यांना इतर मागासवर्गाच्या यादीत समाविष्ट करा' इथपर्यंत आली आहे. ती ज्या संघषार्तून आली, तो संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर आला आहे. यश दिसत असलं, तरी 'संघर्ष संपला' असं म्हटलं, तर ती घाई होईल.

## सगुण-निगुर्णः आनंदवनभुवनी

भविष्यात रामराज्य घडेल हा स्वप्नोपदिष्ट आशावाद वाटला, तरी तो सत्यात उतरेल याबद्दल समर्थांना संदेह नाही; कारण तत्कालीन स्वधर्मीयांना चेतवणारी विजिगीषा या कवितेत त्यांनी ओतप्रोत आणली आहे. भूत, वर्तमान आणि भविष्य यांना सांधणारी कविता कोणती, असं कोणी विचारलं तर निःसंदिग्धपणे जिचं नाव घेता यावं ती स्तोत्ररूपी कविता म्हणजे, समर्थांचं आनंदवनभुवनी ! या काव्याचा विचार काही कारणांनी अभ्यासकांना गूढ वाटत आलाय. आनंदवनभुवन म्हणजे महाराष्ट्र असावा, की काशीक्षेत्र असावं, इथूनच संभ्रमाला सुरुवात होते. दुसरीकडे, जन्मदुःखें जरादुःखें, नित्य दुःखे पुन्हा पुन्हा, संसार त्यागणे जाणे, आनंदवनभुवना अशी तिची करुण सुरुवात करणारे सहा श्लोक आणि वैराग्य जाहले सर्वे आनंदवनभुवनी असे तिचे सांगतेचे श्लोक वाचले, की या कवितेचा बाज वैराग्यपूर्ण असावा असा निर्णय होतो. पण मधले पन्नास श्लोक अभक्तांचा क्षय, म्लेंछसंहार, सर्व पापी बुडाले आणि हिंदुस्थान बळावले असं सांगणारे आहेत. यात समर्थांचे अत्यंत वीररसपूर्ण सहजोद्गार आहेत. मग ही कविता करुणेची की वीररसाची? वैराग्याच्या आवरणात बांधून पण अत्यंत सावधानता बाळगून सांगितलेलं हे शक्तिस्तोत्र आहे. वरवर भक्तिपर वाटावं, पण अंतरंगात ह्यगुप्त ते गुप्त जाणावे, आनंदवनभुवनीæ असं म्हणत उघड्या डोळ्यांनी पाहिलेली संकटं वर्णन करावीत, त्यावर सतर्कतेचे उपाय सांगावेत आणि रामवरदायिनीमातेने पूर्वी पापी नष्ट केले होते तो काळ स्मरणात ठेवून भविष्यात रामराज्याचं स्वप्न पाहावं असं या कवितेचं विलक्षण अंतःसूत्र आहे. रामाने धर्मसंस्थापना केली त्या इतिहासाचं स्मरण यात आहे. वर्तमानात चेतवलेला वन्ही आहे आणि ह्यमोडिली मांडली क्षेत्रे...æ म्हणजे, आमच्या धार्मिक अस्मितेवरचे घाले परतवले जातील, भविष्यात धर्मक्षेत्रं पुन्हा मुक्त होतील, रामराज्य पुन्हा अवतरेल असा आत्मविश्वास यात आहे.

तिन्ही काळांना सांधणारी ही एक अद्भुत कविता आहे. वैराग्याच्या कुपीत दडवलेला वन्ही यात आहे. संपूर्ण काव्यच मननीय! पण नुसती क्रियापदं पाहिली तरी समर्थांच्या वाणीचं तेज लक्षात येतं. लाटिली, कुटिली, दापिली, कापिली, घर्डिली, चीर्डिली, रडवली, बडवली, खौळली... शक्य तितक्या साऱ्या मार्गांनी स्वराज्यावर चालून आलेल्या विघ्नांचा समाचार घेतला जाईल, हे सांगताना तलवारीप्रमाणे समर्थांचे शब्द पराक्रमाचे कल्लोळ करतात. त्यातून जे शब्द निपजतात ते आनंदवनभुवनी असतात!

# अविश्वासाचा धोका कायम



विरारमध्ये धोकादायक इमारत कोसळून १७ जणांचा बळी गेल्यानंतर दरवर्षीप्रमाणे या पावसाळ्यातही पालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचा प्रश्न पुढे आला आहे. मुंबईत घरांच्या किमती गगनाला भिडल्यानंतर सामान्य नोकरदारांनी ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, टिटवाळा, बदलापुरात आश्रय घेणे सुरू केले. मुंबई आणि मुंबईलगतच्या या भागामध्ये आधी गावठाणं होती. त्यांना मोठा दर आल्याने शेतजमिनीही बिनशेतीच्या करण्यात आल्या आणि इमारती उभारणे सुरू झाले. हे काम मागील पाच दशकांपासून सुरू होतेच. मात्र मागील वीस वर्षात जागतिकीकरणानंतर त्याला कमालीचा वेग आला आणि ही शहरांची सूज वाढू लागली.मुंबई पर्यटन

कल्याण डोंबिवली, ठाण्यातील शहरबाह्य परिसर फुगत चालला आहे. उल्हासनगर, विरार नालासोपारा, भिवंडी, कळवा, दिवा या भागात मागील चार दशकांपासून बेकायदा इमारती वाढत आहेत. कळवा भागात याआधी रस्ते आणि इतर विकासकामांना अडथळा ठरर्णाया इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या, मात्र येथील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायम आहे. ठाण्यातील महापालिका आणि नगरपालिका क्षेत्रात बेकायदा बांधकामे आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न मागील चार दशकाआधीपासूनच गंभीर आहे.

पालिकेवर अनेकांच्या सत्ता आल्या आणि गेल्या, प्रशासकीय राजवटीही येऊन गेल्या. अधिकारी, आयुक्त, महापौर, अध्यक्ष अनेकदा बदलले, मात्र धोकादायक इमारतींचा प्रश्न कायम आहे. बेकायदा वास्तू आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या भागातही घरांच्या किमती वाढत असल्याने सामान्य कामगार कर्मर्चायांना नाईलाजाने धोकादायक किंवा अधिकृततेची पुरेशी शाश्वती नसलेल्या इमारतींमध्ये घर घ्यावे लागत आहे. या इमारती कालांतराने बेकायदा ठरवल्या जातात. धोकादायक इमारत का असेना कमी किमतीत घर मिळत असल्यास जीवावर उदार होऊन अशी घरे घेण्याकडे सामान्यांचा कल असतो. नगरपंचायतीच्या महापालिका झाल्यावरही धोकादायक इमारतींचा प्रश्न सुटलेला नाही. भिवंडी, उल्हासनगर, कळवा मुंब्रा, नालासोपारा आदी ठाण्याच्या अनेक भागात धोकादायक इमारतींचा प्रश्न खूपच गंभीर बाब होऊन बसला आहे. दरवर्षी पावसाळ्यात या इमारतींच्या प्रश्नांवर चर्चा होते. इमारती कोसळण्याच्या घटना घडल्यावर त्याच्या बातम्या होतात, प्रशासन, सरकारविरोधात संताप व्यक्त केला जातो, त्यानंतर परिस्थिती पुन्हा ह्यजैसे थेæ होते. क्लस्टर किंवा इतर योजनांमुळे आधीच विस्थापनाचा प्रश्न आहे. या शहरांच्या सुनियोजनाचे केव्हाच तीन तेरा वाजले आहेत.

नगरविकास विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक कमतरता आणि भ्रष्टाचाराने पोखरलेल्या आहेत. सरकारी यंत्रणा ढिम्म आहेत, अशा परिस्थितीत वस्तुस्थिती समजून ती बदलण्याची इच्छाशक्ती लोकप्रतिनिधी, नेते आणि कुठल्याही राजकीय पक्षांमध्ये नाही. उभीआडवी वाट्टेल तशी शहरे उभारली गेली आहेत. मेट्रो, क्लस्टरसारख्या योजनांनी गोंधळात भर घातली आहे. केवळ ठाणे महापालिका क्षेत्रातच ३८ धोकादायक इमारती आहेत. या इमारती रहिवाशांशी संवाद साधून तातडीने रिकाम्या करण्याचे निर्देश पालिका प्रशासनाने दिले आहेत. विरारमधील इमारत दुर्घटनेनंतर असे निर्देश देण्यात आले आहेत. अशीच किंबहुना याहीपेक्षा अधिक धोकादायक स्थिती भिवंडी, उल्हासनगर अशा महापालिका, नगर परिषद क्षेत्रात आहेत.

क्लस्टरसारख्या विकास योजनांतील विस्थापितांचा प्रश्न कायम आहे. रस्ते, मेट्रोसारख्या प्रकल्पातील विस्थापितही वाढत आहेत. याआधीच्या योजनेतील विस्तापितांची रवानगी ट्रान्झिस्ट कॅम्पमध्ये झालेली असताना आधीचे घर गेले, आता मिळालेले घरही जाते की काय, या भीतीने कॅम्पमधील घरेही सोडायला कित्येक ठिकाणी रहिवासी तयार नाहीत. धोकादायक इमारतीतील रहिवासी घरे रिकामी करतील, मात्र त्यांना त्यांची घरे पुन्हा उभारून त्याच ठिकाणी किंवा दुर्सया ठिकाणी पुनवर्सनाची शाश्वती नाही. याबाबत सरकार आणि यंत्रणांना सातत्याने अपयश आले आहे. धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचा प्रश्न नेहमी इमारत कोसळण्याची दुर्घटना घडल्यावरच का चचेर्ला येतो, त्यासाठी काही बळी जावेच लागतात का? असाही प्रश्न आहे.

धोकादायक इमारतीमध्ये राहाणे हा रहिवाशांचा नाईलाज असल्याने आणि या नाईलाजावर ठोस असे आश्वासक विश्वासू उत्तर सरकारी यंत्रणांकडे नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

एकट्या ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण 93 अतिधोकादायक इमारती असून त्यापैकी 56 इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत. उर्वरित 37 इमारतींमध्ये एकूण 191 कुटुंबे वास्तव्यास आहेत. महापालिका या इमारती रिकाम्या करून त्याचा ताबा कोणाकडेही देणार नाही. त्या इमारती रहिवाशांच्या ताब्यात राहतील, याविषयी रहिवाशांनी कोणतीही शंका मनात बाळगू नये, असेही ठामपा आयुक्त राव यांनी पुन्हा स्पष्ट केले आहे. रहिवाशांच्या मनात अशी शंका येण्यासाठी याआधीचे अनुभव कारणीभूत ठरले आहेत.

ठाण्यातील 80 हजार कुटुंबीयांचे अजूनही धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य असल्याचे वृत्त आहे, जर असे असेल तर हा मोठा धोका आहे. एकदा राहते घर सोडले की हक्काचा निवारा गमावून बसण्याच्या भीतीपोटी रहिवाशी इमारती रिकाम्या करण्यास तयार नसतात. अशीच स्थिती ठाणे, पालघर जिल्ह्यातील महापालिका, पालिकाक्षेत्रातही थोड्याफार फरकाने आहे. सरकार, पालिका, लोकप्रतिनिधींकडून विकास योजनांच्या आश्वासनांचा उडालेला बोजवारा याला कारण आहे. हा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी विस्थापितांच्या पुनर्वसनाचा ठोस आणि मजबूत असा पर्याय धोकादायक इमारतीतील रहिवाशांना मिळायला हवा, तो जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही.

# गुन्हेगारांची मानसिकता; मानसशास्त्रीय कारणे आणि उपाययोजना

गुन्हेगारांची मानसिकता आणि त्यामागील मानसशास्त्रीय कारणे, गुन्हेगारी कृत्ये करणाऱ्या लोकांची मानसिकता एकाच साच्यात बसवता येत नाही. प्रत्येक व्यक्तीबाबतीत कारणे वेगवेगळी असू शकतात, पण काही सामान्य मानसिक कारणे आणि सामाजिक घटक यामागे कारणीभूत असतात. याबद्दल सविस्तर माहिती आपण या लेखातून घेणार आहोत.

समाजात नेहमीच घडणाऱ्या चोरी, घरफोडी, दरोडा, लुटमार आणि कोणत्याही स्वरूपाची आर्थिक फसवणूक यांसारख्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सामान्य जनतेमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते. जनतेचे मेहनतीने साठवलेले, बँक अकाउंटमध्ये असलेले, रिटायरमेन्टचे पैसे, दागदागिने, रोकड, पार्किंगमधील वाहने देखील चोरटे हातोहात लंपास करतात. शहरी तसेच ग्रामीण भागातसुद्धा जबरी लूट, दरोडा, घरफोडी, महिलांचे मंगळसूत्र खेचणे, खोटे कॉल सेन्टर, सायबरमार्फत आर्थिक फसवणूक, पैसे दाम दुप्पट करणे, सरकारी नौकरी लावण्याच्या बहाण्याने असे आमिष दाखवून सर्वसामान्य जनतेची फसवणूक सुरू आहे. अनेकदा जीवघेणा हल्ला करणे, अपहरण करणे त्यानंतर ब्लॅकमेल करणे यांसारख्या गंभीर घटना देखील घडताना आपण पाहतो. सुशिक्षित, पदवीधर व्यक्तीसुद्धा अशा गुन्ह्यात सहभागी असल्याचे दिसते. अशा गुन्हेगारांना आपण व्हाईट कॉलर क्रिमिनल म्हणू शकतो. अशा गुन्हेगारांचे उच्च राहणीमान, सर्व भाषा सफाईदारपणे बोलणे, त्यांच व्यक्तिमत्त्व, विषयाचं सादरीकरण इतकं प्रभावी असतं की कोणीही त्यांच्यावर संशय घेत नाही. अशा प्रकारचे गुन्हे करणारी व्यक्ती केवळ लोभी किंवा वाईट नसते, तर त्यांच्या या कृतींमागे अनेक जटिल मानसशास्त्रीय कारणे दडलेली असतात. या कारणांना समजून घेणे आणि त्यावर योग्य उपाययोजना करणे हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेकदा चोरी, घरफोडी यांसारख्या गुन्ह्यांचे मूळ कारण दारिद्य आणि बेरोजगारी असते. जेव्हा एखादी व्यक्ती मूलभूत तसेच दैनंदिन जीवनासाठी आवश्यक गरजा पूर्ण करू शकत नाही, तेव्हा ती हताश होऊन चुकीच्या मागार्चा अवलंब करते. समाजात आर्थिक आणि सामाजिक असमानता वाढत असताना, काही लोकांना असे वाटते की, त्यांच्यासाठी न्याय्य मार्ग उपलब्ध नाही आणि म्हणून ते गुन्हेगारीकडे वळतात. कितीही शिकले तरी नोकरी मिळत नाही, उद्योग व्यवसायाला भांडवल उपलब्ध नाही, कोणताही प्रयत्न यश देत नाही, आर्थिक साथ देणारे कोणी नाही अशा परिस्थितीत, सरळ मागार्ने पैसे कमवणे खूप अवघड आहे किंवा खूप वेळखाऊ आहे हे लक्षात आल्यावर अनेकजण गुन्हेगारीकडे वळतात. समाजात प्रामाणिकपणाला, मेहनतीला काही किंमत नाही, खरं वागून, खरं बोलून आपली कधीच प्रगती होऊ शकत नाही असा ग्रह करून वाम मार्गाकडे सुशिक्षित लोक सुद्धा वळतात. आपल्या सरळ मागार्ने कमवलेल्या पैशात आपल्या गरजा, जबाबदाऱ्या, अपेक्षा पूर्ण होत नाही, सतत आर्थिक ओढाताण होते अशा परिस्थितीमध्ये चुकीची संगत, चुकीच्या लोकांचे सल्ले मिळाले तरी अगदी चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लोक चुकीच्या मागार्ने पैसे कमावू लागतात. असे करत असताना त्यांना घरातून, समाजातून चांगले समजावून सांगणारे, शिकवणारे, योग्य मार्गदर्शन देणारे कोणीही न भेटल्यास हे लोक पटकन भरकटतात. हे सर्व होतानाच नैतिक मूल्यांचा अभाव अनेक लोकांमध्ये दिसून येतो. काही व्यक्तींमध्ये लहानपणापासूनच नैतिक मूल्यांची योग्य वाढ झालेली नसते. चुकीचे काय आणि बरोबर काय, याची त्यांना जाणीव नसते. कोणाला लुबाडणे हे चुकीचे वाटत नाही.

अनेकदा, अशा लोकांना चुकीचे मार्गदर्शन मिळते किंवा ते चुकीच्या संगतीमुळे गुन्हेगारीकडे आकर्षित होताना त्यांना कोणीच आडवत नाही, कोणीच आळा घालत नाही. त्यांना तत्काळ मिळणाऱ्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करणे याची थोडीही पर्वा नसते. बालपणी भोगलेले दारिद्य, सतत मनाला मुरड घालावी लागलेली असणे, सरळ सोप्या मागार्ने अथवा खूप मेहनत, कष्ट करूनही अपेक्षित उत्पन्न, यश न मिळणे, घरातील व्यक्तींनी योग्य दिशा न दाखवता फक्त पैसे कमवून आिण यासाठी तगादा लावणे, आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त जबाबदाऱ्या अथवा खर्च ओढवून घेणे, लहानपणापासून चांगले संस्कार मिळालेले नसणे, कायम दुर्लक्षित राहिलेले असणं यामुळे अनेक चांगल्या घरातील व्यक्ती सुद्धा चोऱ्या, लबाडी, आर्थिक फसवणूक करणे असे मार्ग निवडतात. मानसिक विकृती हे देखील महत्त्वाचे कारण अशा गुन्ह्यात पाहायला मिळते. काही विशिष्ट मानसिक विकृतींमुळे देखील व्यक्ती गुन्हेगारीकडे वळू शकते. उदाहरणार्थ, काही लोकांमध्ये 'अँटी-सोशल पर्सनॅलिटी डिसऑर्डर' आढळते. अशा व्यक्तींना दुसऱ्यांच्या भावनांची पर्वा नसते आणि ते नियमांचे उल्लंघन करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्यांना स्वतःच्या फायद्यासाठी इतरांचा वापर करण्यात काहीच गैर वाटत नाही. सामाजिक दबाव आणि प्रतिष्ठा हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत चांगल्या घरातील लोकं सुद्धा जेव्हा अशा मागार्ने पैसे उपलब्ध होण्यासाठी चुकीची कामं करतात. समाजात मिळणाऱ्या 'प्रतिष्ठेसाठी' अनेक लोक गुन्हेगारीकडे वळतात. उदाहरणार्थ, टोळीमध्ये सामील होणे, धोकादायक कृत्ये करणे, समाजात लवकर श्रीमंत होण्याचा दबाव असतो आणि त्यातून फसवणूक, ऑनलाइन स्कॅम यांसारखे गुन्हे घडतात. अशा गुन्हेगारांना 'स्मार्ट' किंवा 'हुशार' मानले जाते आणि समाजामध्ये त्यांना एक प्रकारची चुकीची प्रतिष्ठा मिळते. अशा प्रकारची गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठी काय करता येईल? यावर चर्चा करणे आजकाल खूप निकडीचे आहे.




सामाजिक दृष्टीने आर्थिक विकास करणे गरजेचे आहे. गरिबी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने प्रभावी योजना राबवणे आवश्यक आहे. लोकांना रोजगार आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास, ते चुकीच्या मार्गाकडे वळणार नाहीत. तसेच, गरीब आणि वंचित लोकांसाठी योग्य पुनर्वसन कार्यक्रम सुरू करणे गरजेचे आहे. शिक्षण तसेच नैतिक शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. शाळेतील अभ्यास क्रमांव्यतिरिक्त मुलांना लहानपणी मूल्य, तत्त्व, चांगलं वाईट शिकवण्यात आले पाहिजे. शाळांमध्ये नैतिक मूल्यांवर आधारित शिक्षण देण्यावर भर दिला पाहिजे. अनेकदा घरातील खूप गरिबीचे वातावरण, आहे त्यात समाधान मानन्याची वृत्ती नसणे, लोकांवर अधिकाधिक प्रभाव टाकण्याची जिद्द, आपण खूप वेगळे, मोठे कोणीतरी आहोत हा भ्रम टिकवण्याची मानसिकता, सुखी असण्यापेक्षा सुखी आहोत हे दाखवण्यासाठी केलेली धडपड व्यक्तीला चुकीच्या मागार्ने पैसे मिळवायची प्रेरणा देते. समुपदेशन थेरपी आणि उपचार उपलब्ध करून दिल्यास अशा लोकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवता येऊ शकतो. मानसिक आरोग्य तपासणी आणि उपचार सहज उपलब्ध करून दिल्यास, व्यसनाधीनता आणि इतर मानसिक समस्यांमुळे होणारे गुन्हे कमी होतील. समाजातील प्रत्येक व्यक्तीने फसवणुकीचे प्रकार, ऑनलाइन स्कॅम आणि इतर गुन्हेगारी कृत्यांविषयी जागरूक असणे महत्त्वाचे आहे. आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी डिजिटल साक्षरता वाढवणे आणि सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, नागरिकांनी संशयास्पद किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांबद्दल पोलिसांना त्वरित माहिती दिली पाहिजे. आपल्या आजूबाजूला कुठेही कोणीही असे चुकीचे कृत्य करते आहे अथवा करू शकते अशी जाणीव झाल्यास त्याला वेळेत आळा घातला गेला पाहिजे. या उपाययोजनांचा एकत्रित वापर केल्यास, समाजात सुरक्षितता वाढू शकते आणि गुन्हेगारी कृत्ये करण्यामागील मूळ कारणांवर नियंत्रण मिळवता येऊ शकते. गुन्हेगाराला केवळ शिक्षा देणे पुरेसे नाही, तर त्याच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यामागील कारणे दूर करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. कायद्याने झालेली शिक्षा गुन्हेगाराला तात्पुरते रोखण्यासाठी मदत करते; परंतु अनेक लोकांमध्ये शिक्षा भोगून पण गुन्हेगारी वृत्ती कायम राहते. अनेकदा शिक्षा भोगल्यावर गुन्हेगार जास्त पक्का होतो, निरड होतो आणि जास्त जोमाने परत त्या मार्गाकडे आगेकूच करतो त्यामुळे गुन्हेगारीचा समूळ नायनाट करण्यासाठी गुन्हेगारांचे समुपदेशन खूप मोलाची भूमिका बजावते.

# गणपतीच्या कानात बोला हा एक शब्दाचा मंत्र बाप्पा होतील प्रसन्न करतील निश्चित मनोकामना पूर्ण...!

गणपती बाप्पाला आपण विघ्नहर्ता म्हणतो. कारण बाप्पा आपल्या आयुष्यातील प्रत्येक संकटाचा नाश करतो. गणपतीला मंगलकायार्चा देवता मानले जाते. त्यामुळे बाप्पा हा आपली कितीही कठीण इच्छा असली तरी ती पूर्ण करतो अशी मान्यता आहे. त्यामुळेच अनेक ठिकाणच्या गणपतीला नवसाला पावणारा गणपती असे देखील म्हणतात. गणेशोत्सवाच्या काळात अनेकांच्या घरात बाप्पाचे आगमन होते. यावेळी आपण बाप्पाला आपल्या समस्या सांगतो. आपली इच्छा पूर्ण व्हावी म्हणून काहीजण नवस देखील करतात. मात्र बाप्पाला काय आणि कसे मागावे हेच आपल्याला माहित नसते. आपल्याला काय हवे आहे हे त्या गणेशाला जर योग्य पद्धतीने सांगितले तर तो आपले म्हणणे नक्की ऐकतो आणि अशक्य वाटणारी इच्छा देखील पूर्ण करतो. पाहुयात गणपतीला आपली इच्छा कशी सांगावी व मनोकामनापूतीर्साठी गणेशाच्या कानात कोणता मंत्र म्हणावा.

गणपतीला आपली मनोकामना कशी सांगावी

आपल्या मनातील इच्छा कोणत्याही देवाला सांगताना मनात पूर्ण विश्वास असावा. गणपतीच्या समोर पूर्ण श्रद्धेने बसा. हात जोडून अगदी मनोभावे बाप्पाचे स्मरण करा. बाप्पाला म्हणा हे विघ्नहर्ता तू प्रत्येकाच्या आयुष्यातील विघ्नांचे हरण करतोस, संकटांचा विनाश करतोस. आज मी देखील संपूर्ण विश्वासाने तुज्यासमोर बसलो आहे. माज्या आयुष्याची दोर तुज्या चरणी अर्पण करत आहे. आता माझं भलं करणं हे तुज्याच हातात आहे बाप्पा. माज्याकडून काही



चुकलं असेल तर मला माफ कर. मला योग्य मार्ग तूच दाखव बाप्पा. मी तुझा दास आहे छोटासा भक्त आहे. माज्या मनातील इच्छा तूच पूर्ण करू शकतोस हा माझा विश्वास तोडू नकोस. असं अगदी अंतःकरणाने बाप्पा समोर बसून आपली इच्छा त्यांना सांगा. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपली इच्छा पूर्ण होईल हा विश्वास मनात घेऊनच बाप्पा समोरून उठा.

आपले आचरण व कर्म चांगले ठेवा आणि आपल्या मनोकामनापूतीर्साठी स्वतः देखील मेहनत करा. बाप्पा आपल्याला मार्ग दाखवतो मात्र मेहनत आपण केली तर प्रयत्नांती परमेश्वर हे वाक्य खरे ठरते. त्यामुळे प्रयत्न करत रहा बाप्पा तुमची इच्छा नक्की पूर्ण करेल.

गणपतीच्या कानात कोणता मंत्र म्हणावा

गणपती बाप्पाच्या कानात आपली मनोकामना आपण सांगतो. मात्र बाप्पाच्या कानात जर हा विशिष्ठ मंत्र म्हंटला तर मनोकामना पूर्ण होते असे मानतात. हा मंत्र आहे ₹मोरया₹ आणि ₹विघ्नहर्ता₹ यातील कोणताही एक मंत्र तुम्ही विश्वासाने पूर्ण भक्तिभावाने बाप्पाच्या कानात बोलून जर त्यांना आपली इच्छा सांगितली तर ती पूर्ण होते अशी मान्यता आहे. मात्र हा मंत्र जर तुम्ही नियमित जप केला तर त्याचा अधिक लाभ मिळतो असे म्हणतात. हा एक शब्दाचा मंत्र दिवसातून किमान १५ मिनिटे तरी बाप्पाच्या समोर बसून म्हणावा. किंवा याच्या रोज ११ माळा जप केल्याने त्याचे शुभ फळ मिळते अशी देखील मान्यता आहे.

## ईश्वराला नैवेद्य का दाखवला जातो? नैवेद्य अर्पण केल्याशिवाय भोजन अपूर्ण असे का मानतात?

हिंदू धर्मामध्ये ईश्वरचरणी नैवेद्य (प्रसाद) अर्पण करण्याची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. अनेक लोक याला एक कर्मकांड मानतात परंतु धार्मिक जाणकारांच्या मते नैवेद्य हा देवाच्या प्रति आपण मानलेला आभार, आपली भक्ती आणि त्याच्यासमोर आपल्या आत्मसमर्पणाचे एक प्रतीक असते. देवासमोर ठेवलेल्या नैवेद्याला आपण प्रसाद म्हणतो. नैवेद्याचा शाब्दिक अर्थ म्हणजे भगवंताला अर्पण केलेलं पवित्र भोजन. देवाला अर्पित केल्यानंतर जेव्हा भक्तगण ते ग्रहण करतात तेव्हा आपण त्याला प्रसाद म्हणतात. श्रीमद्भगवद्गीतेत असं म्हटलंय, ₹यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्₹. याचा शाब्दिक अर्थ असा आहे की, तुम्ही जे काही बनवता, ग्रहण करता, दान करता, तप करता, असे सर्व काही तुम्ही मला अपर्ण करा. तर देवतांना नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा का सुरू झाली? त्यामागे काय कारण आहे चला तर माहिती घेवूया.

1. आभार आणि कृतज्ञता व्यक्त करणे

नैवेद्य अर्पण करण्याचे प्रथम उद्दिष्ट म्हणजे ईश्वराप्रती आभार व्यक्त करणे. प्राचीन काळापासून अशी मान्यता आहे की प्रकृतीपासून आपल्याला जे काही प्राप्त होतं, जसे की अन्न, जल, जीवन, हे सर्व ईश्वराच्या कृपेमुळेच मिळतं. यामुळेच सर्वप्रथम ईश्वराला अर्पण करून मग ग्रहण करणे आपल्या विनम्रतेचं आणि कृतज्ञतेचं प्रतीक असतं. नैवेद्य अर्पण करताना मनात ही भावना असते की, ह्यईश्वरा हे सर्व भोजन तुझे आहे, त्यावर माझा हक्क नाही.ह्व अशा भावनेतून नैवेद्य अर्पण केला की आपल्यातील मीपणा संपून त्यागाची आणि समर्पणाची भावना विकसित व्हायला मदत होते.

2. नैवेद्याला शुद्ध आणि पवित्र बनवणे.

जेव्हा आपण कुठलाही पदार्थ शुद्ध अंतःकरणाने नैवैद्य म्हणून भगवंताच्या चरणी अर्पित करतो तेव्हा त्याचा प्रसाद बनतो. शास्त्रांमध्ये असं सांगितलेलं आहे की, ₹नैवेद्यं शुद्धिकृतं भवति देवस्य संर्पणात्ह्व. याचा अर्थ असा आहे, ह्यजेव्हा आपण कुठलाही पदार्थ ईश्वराला समर्पित करतो तेव्हा तो एका भौतिक वस्तूपासून अध्यात्मिक ऊर्जा असलेल्या प्रसादामध्ये परिवर्तित होतो. असा प्रसाद केवळ आपल्या शरिरासोबत मनाची आणि आत्म्याचीदेखील शुद्धी करतो.

33. पाच यज्ञांमधील एक- भोजनापूवीर्चा देवयज्ञ

मनुस्मृती आणि गृह्यसूत्रांच्या मतानुसार माणसाने दररोज पाच यज्ञ करण्याचे विधान आहे. यात देवयज्ञ (देवाला अर्पण), ऋषीयज्ञ, पितृयज्ञ, नरयज्ञ (अतिथी सेवा) आणि भूतयज्ञ (पशु-पक्षांना अन्नदान करणे). यामध्ये देवयज्ञांतर्गत नैवेद्य अर्पण होतो. प्रत्येक देवाचे आवडते पदार्थ असतात जसे की गणपतीला मोदक प्रिय असतात, श्रीकृष्णाला लोणी आणि खडीसाखर प्रिय असते, महादेवाला बेलपत्र आणि जल प्रिय असते. शुद्ध अंतःकरणाने, सात्विकतेने आणि कुठलाही अहंकार न बाळगता अर्पण केलेल्या नैवेद्यात प्रसाद बनतो.

4. ईश्वराप्रती असलेल्या भक्तीचे साधन

ईश्वराप्रती असलेल्या आपल्या भक्तीसाठी नैवैद्य हे एक उत्तम माध्यम आहे. जसे आपण आपल्या घरी आलेल्या एखाद्या पाहुण्याला जेवण वाढतो तसेच आपण भगवंताला आदरपूर्वक नैवैद्य अर्पण करतो. नैवैद्य बनवताना आपल्या मनात भावना असते की प्रत्यक्ष भगवंत आपल्याबरोबर भोजन ग्रहण करत आहेत. त्याचप्रमाणे कुठलीही गोष्ट सर्वप्रथम देवासमोर ठेवल्याने संयम, संतुलन आणि समाधानाची भावना जागृत होते. यामुळे भोजनाप्रती असलेल्या लोभापासून आणि इतर विकारांपासून मुक्ती मिळते.



## घराच्या मुख्य द्वारात हळदीचे पाणी शिंपडल्यामुळे नेमकं काय होतं?



ज्योतिषशास्त्राप्रमाणेच हिंदू धर्मात वास्तुशास्त्राचे विशेष महत्त्व आहे. घरात कोणतीही वस्तू योग्य दिशेने ठेवल्यास घरातील व्यक्तीला सुख, समृद्धी आणि शांती मिळते असे मानले जाते. म्हणूनच, ज्योतिषी घर बांधण्यापासून ते सजवण्यापर्यंत वास्तुची काळजी घेण्याचा सल्ला देतात. इतकेच नाही तर घर बांधल्यानंतर, त्यात लावलेल्या वनस्पती, वस्तूंची देखभाल इत्यादींमध्ये वास्तुचे स्वतःचे महत्त्व आहे. असे केल्याने घरात आनंद आणि समृद्धी राहते. त्याचप्रमाणे पाण्याचे काही प्रयोग देखील शुभ मानले जातात. आता प्रश्न असा आहे की, पाण्यात कोणत्या गोष्टी मिसळून शिंपडल्या पाहिजेत? पाणी शिंपडण्याचे काय फायदे आहेत?

ज्योतिषाचार्य म्हणतात की शास्त्रांमध्ये अनेक गोष्टींचे वर्णन केले आहे. हिंदू धर्मामध्ये ज्योतिषशास्त्राला विशेष महत्त्व दिले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, त्यांच्या नियमांचे पालन केल्यास तुम्हाला लाभ होते. तसेच वास्तूशास्त्राला देखील महत्त्वाचे मानले जाते. त्याचप्रमाणे पाणी शिंपडण्याचाही उल्लेख आहे. तथापि, जर तुमच्याकडे त्यासंबंधी माहिती असेल तरच पाणी शिंपडणे फायदेशीर ठरते. या पाण्यात काही गोष्टी मिसळाव्या लागतात आणि ते नियमितपणे योग्य वेळी शिंपडावे लागते.

सकाळी उठून आंघोळ केल्यानंतर, तांब्याच्या भांड्यात पाणी भरा आणि त्यात चिमूटभर हळद घाला. त्यानंतर, हे पाणी मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूंनी शिंपडा. हा उपाय केल्याने आजूबाजूचे वातावरण निरोगी राहील आणि घरात धन आणि समृद्धीची कमतरता भासणार नाही. वास्तुशास्त्रानुसार, सकाळी लवकर उठून आंघोळ केल्यानंतर, घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर नियमितपणे तांब्याच्या भांड्यात पाणी शिंपडा.

हळदीचे पाणी शिंपडण्याचे फायदेङ्क.

संपत्ती आणि नफा मिळण्याची शक्यता असेल :- हा उपाय केल्याने घरात सुख, समृद्धी आणि संपत्ती वाढेल. यासोबतच, घरातील भांडणेही दूर होऊ शकतात. असे केल्याने घरातून नकारात्मक ऊर्जा निघून जाईल.

आजार आणि दोषांपासून मुक्तता :- ज्योतिषी म्हणतात की आठवड्यातून एकदा घराच्या मुख्य दरवाजावर मीठ पाणी शिंपडावे. असे मानले जाते की मीठ केवळ नकारात्मकता दूर करत नाही तर रोग आणि दोषांना देखील दूर ठेवते.

सकारात्मक ऊर्जा :- हळदीमध्ये नैसर्गिकरित्या शुद्ध करण्याचे गुणधर्म आहेत, ज्यामुळे घरात सकारात्मक वातावरण निर्माण होते.

वास्तुदोष कमी होतात :- मुख्य प्रवेशद्वारावर हळदीचे पाणी शिंपडल्याने राहूचा अशुभ प्रभाव कमी होतो आणि वास्तुदोष दूर होतात, असे मानले जाते.

नकारात्मक ऊर्जा दूर होते :- हळदीचे पाणी नकारात्मक ऊर्जा शोषून घेते आणि घराला वाईट शक्तींपासून वाचवते.

आर्थिक लाभ :- हळदीचे पाणी घरामध्ये शिंपडल्याने घरात सुख-समृद्धी येते, असे मानले जाते.

## उजव्या सोंडेच्या गणपतीबद्दल लोकांच्या मनात एवढी भीती का?



सरसकटपणे आपण डाव्या सोंडेचा गणपती पाहिला आहे. अशातच मूतीर्काराकडून एखादी मूर्ती चुकून उजव्या सोंडेची बनवली गेली असेल, तरी त्यातले देवत्त्व अजिबात कमी होत नाही. मनोभावे केलेली पूजा बाप्पापर्यंत पोहोचते. मग तो उजव्या सोंडेचा असा नाहीतर डाव्या सोंडेचा!

पूवार्पार चालत आलेल्या उजव्या सोंडेच्या मूर्तीच्या आराधनेमागे असलेली भक्ती बऱ्याचदा प्रेमापोटी नसून भीतीपोटी असल्यामुळे त्यातून अनेक अपसमजुती प्रचलित होतात. उदा. कडक आचार न पाळल्यास उजव्या सोंडेचा गणपती सर्वनाश करतो, सिद्धिविनायक घरात ठेवू नये, उजव्या सोंडेचा गणपती कडक शिस्तीचा असतो. अशा अनेक अंधश्रद्धा प्रसूत होतात. ज्या घरात उजव्या सोंडेचा गणपती आहे, तिथे काही वाईट अनुभव आल्याचे ऐकिवात नाहीत. योगायोगाने काही गोष्टी घडल्या, तर तो प्रारब्धाचा भाग असतो, यात उजव्या सोंडेच्या गणपतीला दोष देणे योग्य नाही. ज्याप्रमाणे चांगल्या गोष्टींचे श्रेय आपण स्वतःकडे लाटतो, तशीच वाईट गोष्टींची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. याच बऱ्यावाईट घडामोडींना प्रारब्ध म्हणतात. गणपतीच्या सोंडेचे अग्र याच्या उजव्या वरील हाताकडे वळले असल्यास तो सिद्धिविनायक व डाव्या वरील हाताकडे वळले असल्यस तो ऋद्धिविनायक समजला जातो. त्याचप्रमाणे सोंडेचे टोक त्याच्या उजव्या हाताकडे खाली वळले असल्यास तो बुद्धिविनायक व डाव्या हाताकडे खाली वळले असल्यास तो शक्तिविनायक समजला जातो.

या चार विनायकांपैकी सिद्धिविनायक मोक्षसिद्धिप्रद समजला जातो. उजव्या सोंडेच्या गणपतीविषयी धर्मशास्त्रीय ग्रंथात सूक्ष्म तपशीलात्मक असा फारसा ऊहापोह केलेला आढळत नाही. गनेशाच्या निरनिराळ्या ध्यानांमध्येही तसा स्पष्ट उल्लेख आढळत नाही. त्यामुळे काही वृद्ध, जाणकार व निःस्सिम गणेशभक्तांनी दिलेल्या माहितीवर अवलंबून राहावे लागते. ज्या गणेशपंथी साधकांनी गणपती देवतेचा अतिसुक्ष्म विचार केलेला आहे, त्यांच्या मते गणेश व महागणपती या दोन भिन्न संकल्पना असून माता पार्वतीने तयार केलेला गणेश हा महागणपतीचा अवतार आहे. तिने मृत्तिकेला आकार देऊन त्यात महागणपतीचे आवाहन केले. हा महागणपती म्हणजेच जगदुत्पत्ती होण्यापूर्वी निर्गुण व कूटस्थ स्वरूपात असलेले महातत्त्व आहे. महागणपतीनेच विविध प्रसंगी विविध प्रकारचे अवतार घेऊन दुष्टांचा नायनाट केला.

महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी लेण्याद्रीचा गिरिजात्मक हा गणेशावतार व इतर सात महागणपती आहेत, असे म्हटले जाते. जेव्हा विशिष्ट सिद्धी किंवा मोक्षसिद्धिच्या प्राप्तीसाठी गणपतीची आराधना केली जाते, तेव्हा उजवीकडे सोंड असलेला गणपती घेण्याची प्रथा आहे. अशावेळी पार्थिव गणपतीची आराधना केली जाते. या पार्थिव गणेशाच्या आराधनेत स्वहस्ते मृत्तिकेपासून तयार केलेल्या सिद्धिविनायकाचे पार्थिव गणेशाच्या आराधनेत स्वहस्ते मृत्तिकेपासून तयार केलेल्या सिद्धिविनायकाची ध्यानवाहनपूर्वक षोडशोपचार पूजा व त्याचे लगेचच विसर्जन विहित असते. ही पूजा अत्यंत शुचिर्भुतपणे व तंतोतंत विधिविधानपूर्वक करणे आवश्यक असते.

भगवंत आपल्या भक्ताचे कधीच वाईट चिंतीत नाही. लेकरांप्रमाणे तो आपला सांभाळ करतो. सद्बुद्धी देतो. त्यात गणपती ही तर बुद्धीची देवता. मनातील शंका दूर करून डोळसपणे भक्ती केली, तर आपल्या मनात भगवंताप्रती आदरयुक्त भीती, प्रेम आणि भक्ती वृद्धिंगत होत राहील.

## अनंत चतुर्दशीला का बांधला जातो अनंताचा धागा? हे व्रत गणेशाचे नाही तर...



यंदा शनिवार ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीने या वर्षीच्या गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. बुद्धिदात्या, विघ्नहर्त्या बाप्पाकडे तुम्ही यश, समृद्धी, कीर्ती आणि बरेच काही मागितले असेल. त्यालाच जोड द्या अनंताच्या धाग्याची! अनंत चतुर्दशीला भगवान विष्णूंची अनंत या नावे पूजा केली जाते व पूजेत अनंताचा धागा ठेवून पूजा झाल्यावर हा धागा मनगटावर बांधला जातो. असे म्हणतात की जेव्हा पांडवांनी द्युतात सर्वकाही गमावले होते, तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्यांना पुन्हा वैभव मिळवण्यासाठी अनंत चतुर्दशीचे व्रत करण्यास सांगितले. तसेच भगवान विष्णूंचे हे रूप ज्याला आदी नाही आणि अंत नाही, अशा स्वरूपाची पूजा केल्याने सर्व दुःख आणि वेदना दूर होतात.परंतु अनंत चतुर्दशीचे व्रत तसे पाहता थोडे अवघड आहे. परंतु ज्यांना ते व्रत १४ वर्षे करणे शक्य नाही, त्यांनी निदान भगवान विष्णूंची पूजा करून अनंताचा धागा बांधावा आणि आपल्या मागार्तील अडथळे दूर होऊन यश प्राप्त व्हावे, अशी भगवान विष्णूंना प्रार्थना करावी. त्याचा थोडक्यात विधी जाणून घेऊया.

>> अनंत चतुर्दशीच्या दिवशी भगवान विष्णूच्या अनंत स्वरूपाची पूजा केल्यानंतर अनंताचा धागा बांधला पाहिजे. या चमत्कारी धाग्यात प्रत्येक दुःख आणि दैन्यातुन मुक्त होण्याची शक्ती आहे. हा अनंत धागा मनगटावर बांधला जातो. त्यात १४ गाठी असतात. हा धागा पुरुषांच्या उजव्या हाताला आणि स्त्रियांच्या डाव्या हाताला बांधला जातो.

>> १४ गाठींचा धागा बाजारात उपलब्ध होतो. परंतु तसा धागा न मिळाल्यास लाल धाग्याला चौदा गाठी मारून तो धागा पूजेत ठेवावा. ओम नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा १०८ वेळा जप करून तो धागा विष्णूंच्या पायी लावून मग आपल्या मनगटाला बांधावा.

>> या १४ गाठी भगवान विष्णूच्या प्रत्येक स्वरूपाचे प्रतीक आहेत. हे सूत्र परिधान केल्यानंतर, किमान १४ दिवस मांसाहार, मद्य, तसेच शारीरिक संबंध टाळावेत असे शास्त्र सांगते. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून क्षणिक मोहाला बळी पडू नये, यासाठी हे धर्माचरण सुचवले असावे.

>> ज्यांनी आयुष्यात सर्वस्व गमावले आहे, जर त्यांनी हे सूत्र बांधले तर त्यांना नवीन ऊर्जा मिळते. हे सूत्र प्रत्येक दुःख आणि दुःख दूर करते आणि जीवन आनंदाने भरते.

>> शक्य असल्यास अनंत सूत्र धारण केल्याच्या दिवशी उपवास ठेवा आणि श्री विष्णू सहस्त्रनाम स्तोत्राचे पठण करावे. यामुळे आत्मबळ वाढते आणि व्यक्तीला संपत्ती, सुख-समृद्धी सर्व काही मिळते.

>> एक धागा बांधल्याने खरेच हे सर्व शक्य होऊ शकते का, असा अनेकांना प्रश्न पडेल. परंतु हा केवळ धागा नाही, तर ही ऊर्जा आहे. स्वतःला दिलेला आत्मविश्वास आहे. जर पांडव त्यांचे वैभव मिळवू शकतात, तर आपण आपले गमावलेले किंवा आजवर केवळ स्वप्नात पाहिलेले वैभव का मिळवू शकणार नाही? नक्कीच मिळवू शकू. भगवंत आपल्या पाठीशी आहेच आता फक्त प्रयत्नांची जोड द्यायची आहे. त्याची आठवण हा धागा सातत्याने देत राहील, यासाठी हे व्रताचरण करायचे असते.

## गणेशोत्सवाची सांगता; पाहा, मान्यता, २०२६ मध्ये कधी येणार गणपती बाप्पा?

अवघ्या काही दिवसांनी गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी हा कालावधी महाराष्ट्रासह संपूर्ण देशात एक पर्वणी काळ असतो. गणपती बाप्पाचे अगदी उत्साहात स्वागत केल्यानंतर यथाशक्ती, यथोचित सेवा केली जाते. दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, गौरींसह गणपती बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप दिला जातो. अनंत चतुर्दशीला घरगुती, मंडळातील गणपतींचे विसर्जन केले जाते. यंदाची अनंत चतुर्दशी कधी आहे? गणोशोत्सवाची सांगता कधी होणार? जाणून घेऊया...

दीड दिवसाचा, पाच दिवसाचा, सात दिवसाचा किंवा अगदी दहा दिवसाचा गणपती असला, तरी लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना खूप वाईट वाटते. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशी आर्त विनवणी केली जाते. यंदा, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशी आहे. शुक्रवार, ०५ सप्टेंबर २०२५



रोजी मध्यरात्री ०३ वाजून १२ मिनिटांनी भाद्रपद शुद्ध चतुर्दशीची सुरुवात होत आहे. तर, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०१ वाजून ४१ मिनिटांनी अनंत चतुर्दशी समाप्त होईल. रविवार, ०७ सप्टेंबर २०२५ रोजी खग्रास चंद्रग्रहण आहे. भाद्रपद पौर्णिमेचे चंद्रग्रहण शनिचे स्वामित्व असलेल्या कुंभ राशीत लागणार आहे. ०७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांपासून चंद्रग्रहणाचे वेध लागणार आहेत. २०२५ मधील भाद्रपद पौर्णिमेला लागणारे चंद्रग्रहण संपूर्ण भारतात दिसणार आहे. ०७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ०९ वाजून ५७ मिनिटांनी खग्रास चंद्रग्रहणाचा स्पर्श असून, मध्यरात्री ०१ वाजून २७ मिनिटांनी खग्रास चंद्रग्रहणाचा मोक्ष आहे. खग्रास चंद्रग्रहणाचा पर्वकाळ ०३.३० तास आहे. चंद्रग्रहणापूर्वी गणपती बाप्पाचे विसर्जन करावे, असे म्हटले जात आहे. भारतातून ग्रहण दिसणार असल्यामुळे ग्रहणाचे नियम पाळले जाणार आहेत.

२०२६ मध्ये गणपती बाप्पाचे आगमन कधी?

पुढच्या वर्षी बाप्पांचे आगमन १८ दिवस उशिराने होणार आहे. कारण पुढील वर्षी ज्येष्ठ अधिकमास आहे. त्यामुळे पुढच्या वर्षी गणेश चतुर्थी ही १४ सप्टेंबर २०२६ रोजी असेल.

# गणेशोत्सवासाठी महापालिकेच्या तिजोरीतील २४७ कोटी खर्च

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्य सरकारने यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला असून या पार्श्वभूमीवर यंदा मोठ्या जल्लोषात गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई महापालिकेनेही उत्सवकाळात विविध सोयी व सुविधा उपलब्ध केल्या असून त्यासाठी गतवर्षी (२०२४-२५) महापालिकेच्या तिजोरीतील तब्बल ५४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तर गेल्या १८ वर्षांमध्ये गणेशोत्सवातील सुविधांसाठी महापालिकेने २४७ कोटी रुपये खर्च केले आहेत. करोनाकाळापासून गणेशोत्सवातील सुविधांवरील खर्चात प्रचंड वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. दरवर्षीप्रमाणेच यंदाही राज्यभर गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. तसेच, सरकारने यंदा गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा महोत्सव म्हणून घोषित केल्याने उत्सव जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. देशातील विविध भागांतील हजारो भाविक काही प्रसिद्ध मंडळांच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी मुंबईत येतात. या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनातर्फे



उत्सव काळात विविध नागरी सुविधा उपलब्ध करण्यात येतात. वाढती लोकसंख्या आणि काळानुसार सुविधा व त्यावरील खर्चातही वाढ होत आहे.

गतवर्षी महापालिकेने गणेशोत्सवातील विविध सुविधांसाठी तब्बल ५४ कोटी रुपयांचा खर्च केले आहेत. सामाजिक कार्यकर्ते गॉडफ्रे पिमेंटा यांनी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत याबाबत महापालिकेकडे माहिती मागितली होती. त्या अजार्ला दिलेल्या उत्तरातून सदर बाब समोर आली आहे. प्रकाशयोजना, रस्ते नियोजन, मंडप उभारणी, कृत्रिम तलाव आदी विविध सुविधांसाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत आहेत. २००७ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत महापालिकेने उत्सवातील सुविधांसाठी तब्बल २४७.८१ कोटी रुपये खर्च केले आहेत. सर्वाधिक म्हणजेच ५४.४७ कोटी रुपये २०२४-२५ या वर्षात खर्च केले आहेत. उत्सवांतील सुविधांसाठी २०२३-२४ मध्ये महापालिकेने ४९.१० कोटी रुपये, २०२२-२३ मध्ये ३१.१२ कोटी रुपये खर्च केले होते. मात्र २०१८ - १९ मध्ये केवळ १०.२० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. त्यांनतर २०२० -२१ मध्ये हा खर्च २२.८८ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

# मोतीलालनगरमधील रहिवाशांना सेवाशुल्काची पुन्हा वाढीव देयके



■मुंबई। प्रतिनिधी :

गोरेगाव पश्चिम येथील मोतीलालनगरमधील रहिवाशांना सेवाशुल्काच्या थकबाकीची देयके महिन्याभरापासून पाठविली जात आहेत. आता सप्टेंबरमध्ये थकबाकीत आणखी वाढ करून नवीन देयके पाठविण्यात आली आहेत. निवासी रहिवाशांना ७० हजार रुपयांची, तर अनिवासी रहिवाशांना दोन लाख ११ हजार रुपयांची थकबाकी देयकात नमूद करण्यात आली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता म्हाडाच्या मुंबई मंडळ भरमसाठ सेवाशुल्क, थकबाकी कशी आकारत आहे, असा मुद्दा उपस्थित करीत आता रहिवाशांनी थेट म्हाडा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई - मेलद्वारे तक्रार केली आहे. या तक्रारीची मुख्यमंत्री कार्यालयाने दखल घेतली असून गृहनिर्माण विभागाला आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. म्हाडा वसाहतीतील रहिवाशांना पाणी पुरवठ्यासह इतर सोयींसाठी मुंबई मंडळाकडून सेवाशुल्क आकारले जाते. त्यानुसार मोतीलालनगरमधील रहिवाशांना महिन्याला २८८ रुपये सेवाशुल्क आकारले जाते. मात्र ऑगस्टमध्ये या रहिवाशांना थेट १६०० रुपये सेवाशुल्क आकारून २०२१ ते २०२३ पासूनची थकबाकी सेवाशुल्क देयकात समाविष्ट करण्यात आली. ३५ हजार रुपयांची थकबाकी पाहून रहिवाशी हवालदिल झाले.


# येत्या रविवारी खग्रास चंद्रग्रहण; 'या' वेळेत दिसणार अद्भुत लाल चंद्र!

■ठाणे। प्रतिनिधी :

यंदाचे भाद्रपद पौर्णिमेचे खग्रास चंद्रग्रहण खगोलप्रेमींसाठी एक खास पर्वणी घेऊन येत आहे. येत्या रविवार, ७ सप्टेंबर रोजी होणारे हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार आहे, अशी माहिती पंचांगकर्ते आणि खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी दिली आहे.

ग्रहणाची वेळ आणि स्वरूप

रविवारी रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी ग्रहणास सुरुवात होईल. त्यानंतर रात्री ११ ते १२ वाजून २३ मिनिटांपर्यंत चंद्र पूर्णपणे पृथ्वीच्या छायेत आल्याने खग्रास स्थिती दिसेल. या वेळी



पौर्णिमेचा तेजस्वी चंद्र लालसर किंवा तपकिरी रंगाचा दिसेल, जे एक विलोभनीय दृश्य असेल. रात्री १२ वाजून २३ मिनिटांनी ग्रहण सुटण्यास सुरुवात होईल आणि उत्तररात्री १ वाजून २७ मिनिटांनी ते पूर्णपणे संपेल. हे चंद्रग्रहण कोणत्याही प्रकारच्या उपकरणांशिवाय, थेट डोळ्यांनी पाहता येणार आहे.

जगभरातून दिसणार ग्रहण

हे खग्रास चंद्रग्रहण केवळ भारतातच नाही, तर संपूर्ण आशिया, आफ्रिका, युरोप, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधूनही पाहता येणार आहे. खगोलशास्त्र अभ्यासकांसाठी आणि सामान्य लोकांसाठीही ही एक दुर्मिळ संधी आहे. यानंतरचे पुढील चंद्रग्रहण थेट ३ मार्च २०२६ रोजी होईल, असेही सोमण यांनी सांगितले. या खगोलीय घटनेचा अनुभव घेण्यासाठी अनेकांनी तयारी सुरू केली आहे. सगळ्यांनाच हा 'लाल चंद्र' पाहण्याची उत्सुकता आहे.

# रेल्वेकडून आता तिकीट तपासणीसांची होणार बायोमेट्रिक हजेरी

■नागपूर। प्रतिनिधी :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने आधुनिकीकरण आणि पारदर्शकतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत तिकीट तपासणी करणाऱ्यांसाठी (टीटीई) बायोमेट्रिक साइन ऑन/ऑफ प्रणाली लागू केली आहे. ही योजना रेल्वे बोर्डाच्या नव्या धोरणांतर्गत सुरू करण्यात आली असून, ड्यूटी प्रमाणीकरण प्रक्रिया सुलभ करणे आणि तिकीट तपासणी कायार्ची जबाबदारी सुनिश्चित करणे हा यामागचा उद्देश असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



या व्यवस्थेत आता टीटीईची ड्यूटी सुरू करणे आणि ती पूर्ण करणे या दोन्ही प्रक्रिया बायोमेट्रिक पडताळणीद्वारेच प्रमाणित केल्या जाईल. यामुळे कर्मचारी आपल्या मूळस्थान व गंतव्य स्थानकांवर प्रत्यक्ष उपस्थित असल्याची खात्री होईल आणि संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे. ही सुविधा नागपूर विभागातील नागपूर तसेच बल्लारशाह या दोन प्रमुख डेपोमध्ये सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी नागपुरात ६ बायोमेट्रिक यंत्रणा तर बल्लारशाह डेपोमध्ये ४ यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.

या डेपोमधील सर्व तिकीट तपासणी कर्मचारी आता ड्यूटी साइन ऑन /ऑफसाठी केवळ बायोमेट्रिक प्रणालीचाच वापर करत आहेत. नागपूर विभागातील इतर सर्व डेपोमध्ये लवकरच ही प्रणाली विस्तारित करण्याची योजना आहे. ते झाल्यानंतर विभागातील प्रत्येक टीटीईला फक्त बायोमेट्रिक प्रणालीद्वारे ड्यूटी साइन ऑन / ऑफ करणे बंधनकारक राहणार. ही योजना पारदर्शकतेस बळकटी देणार असून, तिकीट तपासणी सेवेत जबाबदारी तसेच कार्यक्षमताही वाढवण्यास कारणीभूत ठरणार असल्याचा विश्वास या संबंधाने रेल्वे अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

डिजिटल सोयी-सुविधांवर भर

देशभरात प्रचंड मोठे नेटवर्क असलेल्या रेल्वेत प्रवाशांसाठीच्या अनेक सोयी-सुविधा डिजिटल करण्यावर भर दिला जात आहे. आधुनिकीकरणाची कास धरतानाच रेल्वे प्रशासनाने अलीकडे पारदर्शितेवरही भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने अशा प्रकारे आपल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा संबंधानेही डिजिटल उपाययोजना राब-विण्याला सुरुवात केल्याने रेल्वे संचालनावरील विश्वास आणखी दृढ होईल, असे मत स्थानिक अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

# १७ वर्षांनंतर नागपूर कारागृहातून 'डॅडी' अरुण गवळीची सुटका



■नागपूर। प्रतिनिधी :

द ह श ा त व ा द ा त ू न ा राजकारणाकडे वळण घेणारा कुख्यात गँगस्टर अरुण गवळी १७ वर्षांनंतर नागपूर सेंट्रल कॅरागृहातून बाहेर आला. २८ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने त्याला बेल मंजूर केली. नागपूर कारागृह प्रशासनाने आवश्यक कायदेशीर औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, गवळी दुपारी सुमारे १२.३० वाजता बाहेर आले. नागपूर पोलिसांच्या सुरक्षेत गवळी नागपूर विमानतळावर पोहचला तेथून तो मुंबईसाठी रवाना झाला. सन २०१२ मध्ये, विशेष एमसीओसीए न्यायालयाने गवळीला शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा ठोठावली; त्यासह १७ लाख रुपये दंडही आकारण्यात आला होता.

गवळीला २००७ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात गवळीला आजीवन कारावासाची शिक्षा झाली होती. २८ ऑगस्टला न्यायाधीश एम एम सुंदरेश आणि न्यायाधीश एन कोटिश्वर सिंह यांनी गवळीला जामीन मंजूर केला.

एप्रिल २०२४ मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००६ मधील राज्य पुनर्मुक्ती धोरणाच्या आधारे गवळीला मुदतपूर्व सुटका मिळावी, असे आदेश दिले, कारण ते ६५ वर्षांचे आहे आणि त्यांनी १४ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण केला असल्याने ते पात्र होते.


# लग्नाच्या 16 व्या दिवशीच 22 वर्षीय पत्नीला संपवलं

■ जम्मू-कश्मीर। प्रतिनिधी:

लग्नानंतर अवघ्या 16 दिवसातच पतीने पत्नीची हत्या केल्याचा प्रकार जम्मू-कश्मीरच्या किश्तवाडमधील संग्रामभाटा गावात घडला आहे. आरोपी पती आमिर मुश्ताक याने सोमवारी मध्यरात्री धारदार शस्त्राने वार करुन पत्नीचा जीव घेतला.

मध्यरात्री सपासप वार

यासमिना बेगम असे 22 वर्षीय मयत नवविवाहित महिलेचे नाव आहे. आमिरने धारधार अवजाराने अनेक वेळा सपासप वार केल्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आमिर मुश्ताक हा नगर परिषदेत कार्यरत आहे. घटनेची माहिती मिळतात पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह



ताब्यात घेतला आणि आरोपीला अटक केली. यासमिनाचा मृतदेह जिल्हा रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आला आहे. यासमिना आणि आमिर यांचा विवाह 18 ऑगस्ट रोजी झाला होता. आमिरचे हे दुसरे लग्न होते. त्याला पहिल्या पत्नीपासून तीन वर्षांचा मुलगा आहे. तलाक झाल्यानंतर आमिरने डोडा जिल्ह्यातील यासमिनासोबत विवाह केला होता प्राथमिक चौकशीत आरोपीने हत्येची कबुली दिली आहे. माझी पत्नी वैवाहिक संबंध ठेवण्यासाठी योग्य नव्हती, माझी फसवणूक करण्यात आली, असं आमिर म्हणाला. यासमिनाच्या कुटुंबीयांनी मात्र आरोपीचे दावे पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. जर आमिरला आमच्या मुलीचा इतकाच त्रास होती, तर त्यांनी यासमिनाला परत पाठवायला हवं होतं, तिचा जीव का घेतला? असा सवाल तिच्या कुटुंबीयांनी विचारला. यासमिना मंगळवारी तिच्या माहेरी जाणार होती, मात्र त्याआधीच आमिरने डाव साधला.

अंत्यसंस्कार न करण्याचा निर्धार

कुटुंबीयांनी यासमिनाचा मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. आरोपीला कठोर शिक्षा मिळेपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. घटनेनंतर रुग्णालयात एकच गोंधळ उडाला.

बहिणीचा गंभीर आरोप

यासमिनाचे आई-वडील आणि बहीण यांची रडून बिकट अवस्था झाली होती. आई-वडिलांची प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. यासमिनाच्या बहिणीने आरोप केला आहे की ही हत्या एकट्या आमिरनेच नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाने मिळून केली असावी.

# मुंबईवरून निघाले... कसाऱ्याजवळ मृत्यूने गाठले; कारचा भीषण अपघात



■मुंबई। प्रतिनिधी:

मुंबईकडून नाशिकच्या दिशेने जात असलेल्या एका कारचा भयंकर अपघात झाला. शहापूर तालुक्यातील कसाराजवळ मंगळवारी (२ सप्टेंबर) रात्री ही घटना घडली. यात दोन जण जागीच ठार झाले, तर एका व्यक्तीचा रुग्णालयात घेऊन जाताना मृत्यू झाला. कारमधील इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

कार मुंबईवरून निघाली होती. कारमध्ये पाच जण होते. मंगळवारी रात्री कसारातील ऑरेंज हॉटेल समोरून जात असतानाच कारचा अपघात झाला. चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती रस्त्याच्या बाजूला असलेल्या मोठ्या खड्डयात जाऊन पडली.

वेगात असलेल्या कारचा या अपघातात पाठीमागच्या बाजूने चक्काचूर झाला. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि इतर कर्मचारी अपघातस्थळी आले. तातडीने त्यांनी कार बाजूला काढली आणि त्यातील जखमींना तातडीने रुग्णालयात नेले. तीन मृतदेह शवविच्छेदनासाठी खर्डी येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. या अपघातामुळे वाहने थांबवल्याने वाहतूक कोंडीही झाली होती. मृत आणि जखमींची नावे अद्याप कळू शकलेली नाहीत.

# म्हाडातर्फे पुणे आणि पिंपरी- चिंचवड शहरांमध्ये साडेचार हजार घरांची सोडत

■पिंपरी। प्रतिनिधी :

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण पुणे (म्हाडा) वतीने येत्या पंधरा दिवसांमध्ये पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमध्ये साडेचार हजार घरांची सोडत काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर चाकण आणि नेरे परिसरामध्ये नवीन प्रकल्प उभारण्याची उभारण्याचे नियोजन आहे, अशी माहिती म्हाडाचे पुणे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना दिली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या आरतीसाठी पिंपरी- चिंचवड आढळराव पाटील आले असताना पत्रकारांशी संवाद साधला. आढळराव पाटील म्हणाले, म्हाडाच्या पुणे महामंडळाअंतर्गत पुणे, सांगली, सातारा, सोलापूर




आणि कोल्हापूर जिल्ह्याचा समावेश होतो. महामंडळाच्या माध्यमातून विविध भागांमध्ये सर्वसामान्य नागरिकांना घरकुल उपलब्ध करून देण्याचे काम केले जात आहे. पुणे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. गेल्या दीड वर्षांमध्ये आत्तापर्यंत घरकुलांसाठी तीन सोडती काढल्या आहेत. येत्या पंधरा दिवसांमध्ये सुमारे साडेचार हजार घरांची सोडत निघणार आहे.' आढळराव पाटील म्हणाले, म्हाडाच्या वतीने स्वतंत्र प्रकल्प उभारण्याबरोबरच खाजगी विकसकांच्या माध्यमातूनही प्रकल्प उभारले जात आहेत. त्यात म्हाडाची भूमिका महत्त्वाची आहे. संत तुकारामनगर येथील सुमारे एक हजार गाळ्यांचा पुनर्विकास करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया तेथील गाळेधारक एकत्र येऊन खाजगी विकासाच्या माध्यमातून प्रकल्प राबवू शकतात. त्या प्रकल्पाला ना हरकत देण्याचे काम म्हाडा करीत आहे.' शहराचा विकास वेगाने होत आहे. त्यामुळे त्या- त्या भागांमध्ये प्रकल्प उभारण्याकडे प्राधान्य दिले जात आहे. म्हाडाच्या वतीने चाकण आणि पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या भागांमध्ये असणाऱ्या चाकण आणि नेरे परिसरामध्ये असणाऱ्या म्हाडाच्या नवीन प्रकल्प राबविण्याचे नियोजन सुरू आहे, असेही आढळराव पाटील यांनी सांगितले.

# 'आयटी'त नोकरीच्या बहाण्याने फसवणूक; कंपनीच्या संचालकांवर आणखी एक गुन्हा




■पिंपरी। प्रतिनिधी :

फ्लायनाट सास प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या संचालकांनी आयटी अभियंत्यांची नोकरी देण्याच्या बहाण्याने फसवणूक केल्याचे प्रकरण उघडकीस आले. त्यानंतर याबाबत २३ ऑगस्ट रोजी हिंजवडी पोलिस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल झाला. त्यानंतर आता सोमवारी (दि. १ सप्टेंबर) दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी एका संचालकाला अटक केली आहे. राहुल जगन्नाथ शिंदे (२४, रा. पिंपरी ता. भोकरदन, जि. जालना) यांच्या फियार्दीवरून दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फ्लायनाट सास कंपनीचे संचालक उपेश रणजित पाटील (३७, रा. रावेत), रोहन अंबुलकर (रा. नागपूर) आणि एका महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी जॉब प्लेसमेंटच्या नावाखाली फियार्दी आणि त्यांच्या इतर मित्रांकडून प्रत्येकी दीड ते अडीच लाख रुपये घेतले.

त्यानंतर त्यांना काही दिवस ऑनलाइन प्रशिक्षण दिले आणि त्यांच्याकडून काम करून घेतले. कोणतेही प्रकल्प न देता संशयितांनी वेगवेगळी कारणे देऊन त्यांना कामावरून काढून टाकले. अशा प्रकारे संशयितानी आयटी फ्रेशर्सचा विश्वासघात केला.

# घरी कुणी नसताना भेटायला गेला अन् होणाऱ्या पत्नीचीच केली हत्या; पालघरमधील घटना




■अकोला। प्रतिनिधी :

एका १७ वर्षीय तरुणीचे तिच्या होणाऱ्या नवऱ्यानेच हत्या केल्याची घटना समोर आली. पालघर जिल्ह्यातील जोहार तालुक्यात असलेल्या बिवलधर गावात ही घटना घडली आहे. एका पोलीस अधिकाऱ्यांने वृत्तसंस्थेला या घटनेबद्दलची माहिती दिली. २२ वर्षीय तरुणाने १७ वर्षीय तरुणीची हत्या केली. मंगळवारी (२ सप्टेंबर) ही घटना घडली. जोहारचे पोलीस उपअधीक्षक समीर एस. माहेर यांनी सांगितले की, आरोपीचे मुलीवर प्रेम होते. त्यांचं लग्नही ठरलं होतं. २२ वर्षीय आरोपी तरुणीला भेटायला यायचा. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मंगळवारी दुपारी तरुणीच्या घरी आला होता. त्यावेळी तिचे आईवडील शेतात गेलेले होते. ते दोघेच घरात होते. त्याचवेळी दोघांमध्ये वाद झाला आणि रागात त्याने तरुणीचा गळा दाबला. त्यात तिचा मृत्यू झाला. दोघांमध्ये वाद का झाला, हे अद्याप कळू शकलेलं नाही. आरोपीने तरुणी हत्या केली आणि तो घटनास्थळावरून फरार झाला. थोड्या वेळाने काही शेजाऱ्यांनी घरात बघितलं असता, तरुणी मृतावस्थेत मिळाली. त्यानंतर याची पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी तरुणीचा मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलीस उपअधीक्षक म्हणाले की, आरोपीचा शोध सुरू होता. बुधवारी त्याला अटक करण्यात यश आले. त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

**हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com**

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com